**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, एस-विभाग, मुंबई. यांचे कायालय**

कक्ष क्रमांक २०२, दुसरा मजला कोकण भवन, नवी मुंबई. ४०० ६१४.

ई मेल आय डी coop.sward.maharashtra@gmail.com दुरध्वनी क्रं. ०२२ - २७५६५०८२

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये आदेश**

जा.क्र.मुंबई/सनि/एस-वि/बी-४/ ९५७ /सन-२०१८

दिनांक २५/ ७ /२०१८

वाचावे :- १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये तरतूद

२)संस्थेने या कार्यालयास दिनांक १८/१/२०१८ रोजी सादर केलेले पत्र

ज्याअर्थी, द कांजुर कल्पतरु को ऑप हौसिंग सोसा लि, सी टी स नं १०३० कांजुर व्हीलेज ,कांजुरमार्ग (पुर्व) मुंबई -४२ (संस्थेच्या नावाने वाचावे) ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ अन्वये नोंदविण्यात आलेली सहकारी संस्था आहे आणि,

ज्याअर्थी, सदरची गृहनिर्माण संस्था ही सहकारी कायदा व मंजूर उपविधीनुसार नोंदविण्यात आलेली सहकारी संस्था असल्याने तिचे कामकाज हे सहकारी कायदा व मंजूर उपविधी व सहकार विभाग महाराष्ट्र शासन यांजकडून वेळोवेळी पारीत परीपत्रकानुसार कामकाज करणे बंधनकारक आहे. आणि,

ज्याअर्थी संदर्भ क्रमांक २ अन्वये संस्थेने दिनांक १८/१/२०१८ रोजीचे पत्रान्वये या कार्यालयाचे असे निदर्शनास आणून दिले आहे की

१) संस्थेच्या तत्कालीन समितीने मेजर रिपेअरपोटी रु. १,८९,८५,६११/- खर्च केलेला आहे .सदर खर्चाची पेमेंट करताना कुठलीही पारदर्शक प्रक्रिया अवलंबिलेली नाही

२) संस्थेच्या तत्कालीन श्री चाको जॉन - सेक्रेटरी, श्री पुष्पम मारु- सभासद यांचे वैयक्तीक खात्यावर संस्थेच्या अकाउंटमधून वैयक्तीकरित्या रक्कम जमा झालेली आहे .

३) दिनांक १/४/२०१५ ते १४/२/२०१६ या कालावधीत रु.२२,६९,९६६/- रोख आणि बेअरर चेकने संस्थेच्या खात्यातून काढलेले आहेत .

त्याअर्थी सदरील मुददयाबाबत सोबत जोडलेल्या परीशिष्टानुसार संस्थेचे आर्थीक नुकसान झाले आहे का ? झाले असल्यास किती याची चौकशी करणे आवश्यक असल्याची माझी खात्री झालेली असल्याने खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे .

Scanned by CamScanner

# आ दे श

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३(अ)अन्वये मला प्राप्त अधिकारान्वये मी ,राजेश लव्हेकर,सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, एस विभाग, मुंबई , द कांजुर कल्पतरु को ऑप हौसिंग सोसा लि, सी टी स नं १०३० कांजुर व्हीलेज ,कांजुरमार्ग (पुर्व) मुंबई -४२ या संस्थेची सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ मध्ये नमुद केलेल्या मुददयांवर चौकशी करण्याचे आदेश देत असून चौकशी अधिकारी म्हणून श्री सी एच कदम, सेवानिवृत्त सहाय्यक निबंधक यांची नियुक्ती करीत आहे .चौकशी अधिकारी यांनी चौकशी पुर्ण करुन तसा अहवाल ३ महिन्याचे आत या कार्यालयास सादर करावा .चौकशी शुल्क म्हणून रक्कम रु २५०००/- कायम करण्यात येत आहे .

सदरचा आदेश मी आज दिनांक २५ /१/२०१८ रोजी माझे सही व कार्यालयीन मुद्रेसह दिला असे.

**( राजेश लव्हेकर )**
**सहाय्यक निबंधक,**
**सहकारी संस्था,एस-विभाग,मुंबई.**

24/1/2018

प्रत :-

१) श्री सी एच कदम, सेवानिवृत्त सहाय्यक निबंधक व चौकशी अधिकारी

२)चेअरमन/सेक्रेटरी, द कांजुर कल्पतरु को ऑप हौसिंग सोसा लि, सी टी स नं १०३० कांजुर व्हीलेज ,कांजुरमार्ग (पुर्व) मुंबई -४२

२/- यांना कळविण्यात येते की त्यांची चौकशीकामी आवश्यक ती कागदपत्रे चौकशी अधिकारी यांचेकडे सुपूर्द करावीत चौकशीसाठीचा खर्चाचा धनादेश मा.जिल्हा उपनिबंधक , सहकारी संस्था (२) पुर्व उपनगरे , मुंबई यांचे नावे जमा करण्यात यावा .

**सहाय्यक निबंधक,**
**सहकारी संस्था,एस-विभाग,मुंबई.**

Recd
25/1/2018

Scanned by CamScanner

# परिशिष्ट अ

**चौकशी मुददा क्रमांक १ :-**

तत्कालीन समितीने सन २०११-२०१२ ते सन २०१४-२०१५ या कालावधीत मेजर दुरुस्तीसाठी केलेल्या एकूण १,८९,८५,६११/- खर्चाची तपासणी करुन चौकशी करुन सदर खर्च योग्य आहे अथवा नाही . सदरची रक्कम प्रत्यक्ष कामासाठी वापरली आहे काय ? झालेले काम प्रत्यक्ष झाले आहे काय व सदरील व्यवहारात संस्थेचे आर्थीक नुकसान झाले आहे काय ? असल्यास किती झाले आहे ?

**चौकशी मुददा क्रमांक २:-**

तत्कालीन समितीने सन २०११-२०१२ ते सन २०१४-२०१५ या कालावधीत ॲड मोरे यांनी दिलेली रु.३०,६२,६१७/- पेमेंट सदरील कोणत्या कामासाठी दिले आहे .संबंधीत ॲड.यांनी संस्थेला कोणत्या सेवा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत .सदर वकील फी बार कौन्सील यांचे नियमानुसार देण्यात आली आहे काय ? संस्थेच्या उपविधी कायदा तरतुदीनुसार खर्च योग्य झाला आहे काय ? झाला नसल्यास यामध्ये संस्थेचे किती आर्थीक नुकसान झाले आहे काय ?

**चौकशी मुददा क्रमांक ३:-**

संस्थेचे तत्कालीन श्री चाको जॉन - सेक्रेटरी, श्री पुष्पम मारु- सभासद यांच्या वैयक्तीक खात्यात जमा झालेली रक्कम व संस्थेच्या बँक खात्यातून ( सन २०११-२०१२ ते सन २०१४-२०१५ ) दोघांच्या नावावर सदर रकमा जमा झालेले आहेत .सदरील रकमा या कोणत्या कारणासाठी त्यांच्या वैयक्तीक खात्यावर जमा केलेल्या आहेत .संस्थेच्या भागासाठी खर्च झाला आहे काय ? पोटनियम तसेच उपविधीचे पालन केले आहे काय ? त्यात संस्थेचे किती आर्थीक नुकसान झाले आहे .

श्री पुष्पम मारु तत्कालीन सेक्रेटरी रु.४ लाख चेक नं ८७५४० दिनांक ४/९/२०१२

श्री चाको जॉन, सभासद रु.४,९९,२१८/- ( रु.१६४३७/- चेक नं.७५१८१ दिनांक २६/४/२०११ रु.१२५५०/- चेक नंबर ७५१८३ दिनांक १२/५/२०११ रु९०००/- चेक नं.८९५१० दिनांक ३०/५/२०१२ रु.२०,०००/- चेक नंबर १३९३३८ दिनांक १३/१२/२०१२ रु२४ हजार चेक नंबर १५३०३५ दिनांक २१/८/२०१३ रु.३,०९,५९६/- चेक नंबर ८७५४२ दिनांक ४/९/२०१२ रु५० हजार चेक नं.१७३४२३ दि.३१/१०/२०१४ रु.१५ हजार चेक नं १८९८०५ दि.६/१०/२०१५ रु.१७६३५/- चेक नं.१९३१३० दि.१३/१/२०१६ रु.२५ हजार चेक नंबर १९३१३२ दिनांक २५/१/२०१५

( राजेश लव्हेकर )
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था,एस-विभाग, मुंबई.

२५/१/२०१८

Scanned by CamScanner